नियमित फौ. ख. क्र. १३२/२०२४
सरकार -वि.- कृष्णा
नि.क्र. १८.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.४ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - सारंग ज्ञानेश्वर श्रीरामे,
वय २७ वर्षे, व्यवसाय – रोज मजुरी,
राहणार – धामणगाव, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>**

१. मी आरोपीला ओळखतो. दिनांक ०३.०९.२०२४ रोजी पोलिसांनी मला बोलाविले नव्हते. मी जात आसताना बौद्ध विहार येथे पोलिसांनी माझ्या समक्ष एक गोटा जप्त केला होता. पोलिसांनी माझ्या समक्ष कागदपत्र तयार केले होते, परंतु, ते कागदपत्र मी वाचून पाहिले नाही. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर माझी सही नाही. त्यातील मजकुर मला माहीत नाही. जप्त केलेला दगड दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला दाखविलेला आर्टिकल 'अ' वरील दगड तोच आहे.
सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०३.०९.२०२५ रोजी पोलीसांनी मला मौजा धामणगाव ता. भिवापूर येथे पंचनाम्याकरीता बोलाविले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझे समक्ष घटनास्थळावरुन एक

ओबडधोबड दगड जप्त केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला पंचनामा वाचून दाखविला व त्यानंतर माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, जप्ती पंचनाम्यावर माझी सही नाही हे मी खोटे सांगत आहे. मी शुभम रंगारीला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, मी आज फिर्यादीच्या गाडीवर बसून आलो होतो तो आज कोर्टात हजर आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी आज फिर्यादीसोबत बोल चाल झाली. हे म्हणणे खरे आहे की, मला आज कोर्टात काय सांगायचे हे फिर्यादीने सांगितले होते म्हणून मी आज सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे आरोपीच्या पत्नीसोबत भांडण होते. हे म्हणणे खरे आहे की, आर्टिकल अ सारखे दगड गावात असतात. पोलिसांनी माझ्या समक्ष दगड जप्त केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक - १०.०७.२०२५

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.